MHSO200006462025

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | : | १३/०३/२०२५ |
| खटला नोंदणी दिनांक | : | १३/०३/२०२५ |
| खटला निकाली दिनांक | : | १६/०३/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष म दि<br>०१ ०१ ०३ |

**भाग – 'अ'**

**Form No. XXXII**
**(Title Page of the Judgment)**
**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. ३), ता. सांगोला, जि. सोलापूर**
**(पिठासीन अधिकारी : एस. एस. साळुंखे)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २४६/२०२५** **अपराध क्र. ६०९/२०२३**
**निशाणी क्र. १९**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक, सांगोला पोलीस ठाणे,<br>जि. सोलापूर |
| **सहाय्यक सरकारी अभियोक्ता** | श्रीमती एन. व्ही. पाटील |
| **आरोपी** | धनाजी दत्तात्रय वाघमारे<br>वय – ३५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. गोडसेवस्ती, कमलापुर, ता. सांगोला, जि. सोलापूर. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | श्री. डी. पी. लिगाडे |

**भाग 'ब'**

**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | १२/०७/२०२३ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | १२/०७/२०२३ |
| ३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | १३/०३/२०२५ |
| ४ | अपराध निश्चिती दिनांक | २०/११/२०२५ |
| ५ | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १९/०१/२०२६ |
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | १६/०३/२०२६ |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | १६/०३/२०२६ |
| ८ | शिक्षा सुनावणीचा दिनांक | -- |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावणी | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वरील प्रमाणे | भा.ना.सु.सं. कलम ३५ (३) अन्वये नोटीस | २४/०९ /२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) | निर्दोष | – | – |

**भाग 'क'**

**(Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी –**

अ) अभियोग पक्षाचे साक्षीदार –

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ०१ | दिपक गणपत जानकर | पंच साक्षीदार |

ब) बचाव पक्षाचे साक्षीदार – निरंक

क) न्यायालयीन साक्षीदार – निरंक

**निशाणी कागदपत्रांची यादी –**

अ) अभियोग पक्ष –

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | १७ | जप्ती पंचनाम्यावरील पंचाची सही |

ब) बचाव पक्ष – निरंक

क) न्यायालय – निरंक

ड) भौतिक वस्तु – निरंक

**न्यायनिर्णय**

(घोषीत दिनांक – १६/०३/२०२६)

प्रस्तुत आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे खटला चालविण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षाचे कथन खालील प्रमाणे –

दिनांक १२/०७/२०२३ रोजी पोलीस नाईक गणेश आण्णाराया मेटकरी यांनी सांगोला पोलीस ठाणे, जि. सोलापूर येथे हजर राहून फिर्याद दिली की, त्यादिवशी त्यांच्या वरीष्ठांच्या आदेशान्वये ते स्वतः व इतर पोलीस कर्मचारी सांगोला शहरात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना बातमी मिळाली की, मौजे सांगोला शहरातील शिवपार्वती टॉकीजचे लगत

भिंतीच्या आडोशाला चांडोलवाडी शिवार, ता. सांगोला येथे एक इसम विनापरवाना देशी दारुची विक्री करीत आहे. सबब, त्यांनी दोन इसमांना पंच म्हणून बोलावून घेऊन त्यांना बातमीतील हकीकत सांगून ते पंच म्हणून येण्यास तयार झाल्यावर ते व पोलीस कर्मचारी तसेच दोन पंच बातमीच्या ठिकाणी गेले. तेथे त्यांना एक इसम पांढऱ्या रंगाची पिशवी घेऊन बसलेला दिसला. त्याचा संशय आल्याने त्यांनी त्यास जागीच पकडले व पंचासमक्ष त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव धनाजी दत्तात्रय वाघमारे, रा. गोडसेवाडी, कमलापूर, ता. सांगोला असे सांगितले. त्याच्या ताब्यातील पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये देशी दारु संत्रा कंपनीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या १३ सिलबंद बाटल्या रक्कम रु. ९००/– किंमतीचा प्रोहीबीशन मुद्देमाल मिळून आला. त्यानंतर, रासायनिक विश्लेषणाकरीता जप्त मुद्देमालातून एक बाटली काढून घेऊन त्यावर पंचाच्या व पोलिसांच्या सहयांचे कागदी लेबल लावून ताब्यात घेतले व उर्वरीत मुद्देमाल जप्त केला. सबब, सदर आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केल्यामुळे फिर्यादीने त्याचेविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे.

**३.** सदर फिर्यादीवरुन प्रस्तुत आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे सांगोला पोलीस ठाणे, जि. सोलापूर येथे गु.र.क्र. ६०९/२०२३ नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक एन. टी. वाकीटोळ यांनी केला. सदर गुन्ह्याचा सखोल तपास करून त्यांनी आरोपीविरुद्ध सबळ पुरावा आल्याने या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** त्यानंतर, प्रस्तुत आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे या न्यायालयाने त्याचेविरुद्ध अपराध नि.क्र. १५ वर तयार करुन सदरचा अपराध त्यास मराठीमध्ये वाचून दाखविला असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे न्यायालयासमक्ष कथन केल्यामुळे त्याचेविरुध्द प्रकरण पुढे चालवण्यात आले.

**५.** आरोपीच्या विरुध्द ठेवण्यात आलेला अपराध शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाद्वारे केवळ एक साक्षीदार म्हणजेच जप्ती पंच साक्षीदार दिपक गणपत जानकर (सा.क्र.१) याची साक्ष नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन केलेले नाही. इतर साक्षीदारांना

वेळोवेळी साक्षीसमन्स काढूनसुध्दा ते हजर झालेले नाहीत व तपासण्यात आलेला जप्ती पंच अभियोग पक्षास सहकार्य करत नाही, या पार्श्वभूमीवर खटला अधिक काळ प्रलंबित ठेवणे निरर्थक दिसून आल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपीचे विरुध्द ग्राहय धरण्याजोगे कुठलीही बाब न आल्याने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

७. अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. व्ही. पाटील व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. डी. पी. लिगाडे यांचा युक्तीवाद ऐकला.

८. अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा व दोन्ही बाजुचा युक्तीवाद लक्षात घेता या केसच्या निर्णयाकामी पुढील मुद्दे उपस्थित होतात. ते खालील मिमांसेद्वारे निष्कर्षास काढत आहे.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि. १२/०७/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास मौजे गोडसेवाडी, कमलापूर, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे प्रस्तुत आरोपी देशी दारु संत्रा कंपनीच्या प्रत्येकी १८० मिलीच्या एकूण ११ सिलबंद बाटल्या रक्कम रु. ९००/– किंमतीच्या मुद्देमालासह विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेल्या अवस्थेत मिळुन आला व त्याअन्वये आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) नुसार शिक्षेस पात्र गुन्हा केला ? | नाही |
| २. | आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ व २ करीता –**

९. अभियोग पक्षाने आरोपीचा गुन्हा शाबीत करणेसाठी केवळ एक पंच म्हणजेच साक्षीदार क्र. १ दिपक गणपत जानकर यास नि.क्र. १६ वर तपासले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात सांगितले की, दि. १२/०७/२०२३ रोजी सांगोला पोलिसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी बोलावले नाही व त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आलेला नाही. सदर साक्षीदाराने जप्ती पंचनाम्यावरील त्याची सही मान्य केली, परंतु सदर पंचनाम्यातील मजकुराबाबत त्यास काहीही माहिती नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही, त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. त्याप्रमाणे परवानगी देण्यात आली. तथापी, त्याने अभियोग पक्षातर्फे विचारण्यात आलेल्या सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

१०. सदरकामी दिलेली फिर्याद शाबीत करणेसाठी फिर्यादीस तपासणे अत्यावश्यक होते. फिर्यादी हा पोलीस कर्मचारी असून देखील साक्षीदाराला पुराव्याकामी न्यायालयासमोर उपस्थित ठेवणे अभियोग पक्षाला शक्य झाले नाही. महत्वाची बाब म्हणजे आरोपीच्या ताब्यातून देशी दारु जप्त केल्याचे अभियोग पक्षाचे कथन असले तरी त्याबाबतचा रासायनिक विश्लेषण अहवाल अभिलेखावर सादर केलेला नाही. अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवून देखील इतर साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरल्याने नि.क्र. १ वरील आदेशान्वये त्यांचा पुरावा बंद करण्यात आला.

११. सदर प्रकरणातील आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी आवश्यक पुरावा अभिलेखावर नाही. फिर्यादीप्रमाणे गुन्हा सिध्द होणारा सबळ पुरावा अभिलेखावर नाही. भारतीय पुरावा कायद्यान्वये आवश्यक असणारी अनुपलब्धता अभियोग पक्षास या प्रकरणी पुर्णतः अपयशी ठरवते. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द दाखल केलेल्या खटल्याबाबत संशय निर्माण होतो. फौजदारी न्यायतत्वाप्रमाणे निर्माण झालेल्या संशयाचा फायदा आरोपीवर लादलेल्या गुन्ह्यातुन मुक्त होण्यासाठी पुरक ठरतो. सबब, संशयाच्या फायद्याला अनुसरुन आरोपीस निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त होते. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नाकारार्थी देतो व त्यानुसार मुद्दा क्र.२

करिता खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **धनाजी दत्तात्रय वाघमारे** यास महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या अपराधातून भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१(१) च्या पुर्ततेसाठी प्रस्तुत प्रकरणात पुर्वी दिलेला जामीन अपिल कालावधीपर्यंत कायम करण्यात येतो.

३. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१(१) चे पुर्ततेकामी आरोपीने आज रोजी रुपये ३०,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे. सदरचे वैयक्तीक बंधपत्र आजपासून ०६ महिन्यांच्या कालावधीनंतर रद्द झाल्याचे समजण्यात यावे.

४. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल यापूर्वी नष्ट केला नसल्यास आजपासून ९० दिवसांच्या कालावधीमध्ये अपिलाची सूचना प्राप्त न झाल्यास विल्हेवाटकामी मा. जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांच्याकडे वर्ग करण्यात यावा.

न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.03.16 18:05:18 +0530

(**एस. एस. साळुंखे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्र. ३, सांगोला.

दि. १६/०३/२०२६.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १६/०३/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १६/०३/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १७/०३/२०२६ |